# पीकेएलच्या पहिल्या टाय ब्रेकरममध्ये पुणेरी पलटनने मारली बाजी! आदित्य- पंकज चमकले

विशाखापट्टणम, २९ ऑगस्ट, २०२५: प्रो कबड्डी लीगच्या १२ व्या हंगामाला दमदार सुरुवात झाली आहे. स्पर्धेतील दुसऱ्या लढतीत अस्लम इनामदारच्या नेतृत्वाखाली खेळणारा पुणेरी पलटण आणि अंकुश राठीच्या नेतृत्वाखाली खेळणारा बेंगलुरू बुल्स हे दोन्ही संघ आमनेसामने होते. एकापेक्षा एक स्टार खेळाडूंची फौज असलेल्या दोन्ही संघात दमदार खेळ पाहायला मिळाला. सामना ३२-३२ ने बरोबरीत सुटला. त्यामुळे टाय ब्रेकरने सामन्याचा निकाल लागला. शेवटी पुणेरी पलटन संघाने टाय ब्रेकरमध्ये ६-४ ने बाजी मारली आणि १२ व्या हंगामात विजयी सलामी दिली.

विशाखापट्टणमच्या विश्वनाथ स्पोर्ट्स क्लबमध्ये पार पडलेल्या सामन्यात पुणेरी पलटन सामन्याकडून चढाई करताना आदित्य शिंदेने ९, पंकज मोहितेने ४ आणि अस्लम इनामदारने ३ गुणांची कमाई केली. तर पकड करताना गौरव खत्रीने सर्वाधिक ४ गुणांची कमाई केली. बेंगलुरू बुल्सकडून आकाश शिंदेने १० गुणांची कमाई केली. तर आशिष मलिकने ३ मजबूत पकड केल्या.

पुणेरी पलटनकडून पहिल्याच चढाईत कर्णधार अस्लम इनामदारने १ गुण कमवत दमदार सुरुवात करून दिली. प्रत्युत्तरात आकाश शिंदेने देखील पहिल्याच चढाईत १ गुण कमवला. अस्लम इनामदार गेल्या हंगामातील सुरुवातीचे सामने खेळल्यानंतर बाहेर झाला होता. पण यावेळी त्याने दमदार पुनरागमन केलं आहे. पंकज मोहितेने पहिल्याच चढाईत बोनसचा प्रयत्न केला. पण त्याची बेंगळुरूकडून पकड झाली. पुणेरी पलटनकडून तिसऱ्याच मिनिटाला आदित्य शिंदेने सुपर रेड केली. ही या सामन्यातील पहिली सुपर रेड ठरली.

पुर्वार्धातील पहिल्या ५ मिनिटात पुणेरी पलटनचा संघ ६-५ ने आघाडीवर होता. पुणेरी पलटनचे खेळाडू चढाईत गुणांची कमाई करत होते. पण बचावात त्यांना हवी तशी कामगिरी करता येत नव्हती. तर दुसरीकडे बेंगलुरूचे खेळाडू मजबूत पकड करत होते. पुर्वार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटात पुणेरी पलटनने १ गुणांची आघाडी कायम ठेवली. सामन्यातील ११ व्या मिनिटाला आकाशने पहिल्याच चढाईत २ गुणांची कमाई केली त्यानंतर पंकज मोहितेची डू ओर डाय रेडमध्ये पकड झाली. यासह बेंगळुरूने ८-१० ने आघाडी घेतली. सामना अटीतटीचा सुरू होता त्यामुळे दोन्ही संघांनी डू ओर डायवर खेळण्यावर भर दिला. दरम्यान सुपर टॅकलची संधी असताना पुणेरी पलटनने आकाश शिंदेची पकड करत गुण १०-१० ने बरोबरीत आणले.

पुर्वार्धातील शेवटची २ मिनिटं शिल्लक असताना पुणेरी पलटनकडे १ गुणाची आघाडी होती. पुर्वाधातील शेवटच्या चढाईत पुणेरी पलटनकडून गौरव खत्रीने मजबूत पकड केली. पण त्याचा पाय अंतिम रेषेच्या बाहेर गेला होता. त्यामुळे बेंगलुरू बुल्सला एक गुण मिळाला. यासह दोन्ही संघांचे गुण १३-१३ ने बरोबरीत आले. पुर्वार्धात बेंगलुरू बुल्सने चढाई करताना ८ गुणांची कमाई केली. तर पुणेरी पलटनने ९ गुणांची कमाई केली. यादरम्यान पुणेरी पलटनने एक सुपर रेड देखील केली. तर पकड करताना बेंगलुरू बुल्स आणि पुणेरी पलटनने प्रत्येकी ४-४ गुणांची कमाई केली.

उत्तरार्धात आकाश शिंदेने पहिल्याच चढाईत गुण मिळवला आणि गुण बरोबरीत आणले. उत्तरार्धात चौथ्या मिनिटाला पुणेरी पलटनचा संघ ऑलआऊट होण्याच्या उंबरठ्यावर असताना पंकज मोहितेने बोनस आणि सुपर रेड मारली. पंकजने हनुमान उडी घेत पुणेरी पलटनसाठी ४ गुणांची कमाई करून आघाडी मिळवून दिली. त्यानंतर बेंगलुरू बुल्सचा संघ ऑलआऊट होण्याच्या उंबरठ्यावर असताना आशिष मलिकने बोनस आणि १ गुण कमवला. उत्तरार्धातील ७ व्या मिनिटाला आशिष मलिकने आदित्य शिंदेचा सुपर टॅकल करत आपल्या संघाला २ गुण मिळवून दिले. पुर्वार्धात दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. उत्तरार्धातही बरोबरीची लढत पाहायला मिळाली. उत्तरार्धातील ११ व्या मिनिटाला अलीरेजाने एक गुण घेत संघाला ऑल आऊट होण्यापासून वाचवलं.

उत्तरार्धातील शेवटची १० मिनिटे शिल्लक असताना अस्लम इनामदार चढाईला आला त्यावेळी बेंगलुरू बुल्सने मजबूत पकड केली. पण अंकुश राठीचा पाय सीमारेषेला स्पर्श झाल्याने अस्लम इनामदार बाद झाला. त्यानंतर आकाश शिंदेची पकड करत पुणेरी पलटनने बेंगलुरू बुल्सवर पहिला लोन चढवला. उत्तरार्धात पुणेरी पलटनच्या खेळाडूंनी दमदार बचाव केला. शेवटचे ६ मनिटे शिल्लक असताना डू ओर डाय रेडवर पंकज मोहितेची पकड झाली. शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनचा संघ ३१-२९ ने आघाडीवर होता. शेवटचे ३ मिनिटे शिल्लक असताना डू ओर डाय रेडमध्ये बेंगलुरू बुल्सने आदित्य शिंदेची पकड करून १ गुणाची आघाडी कमी केली. त्यानंतर चढाईत आकाश शिंदेने २ गुणांची कमाई करत बेंगलुरू बुल्सला १ गुणाची आघाडी मिळवून दिली. शेवटच्या मिनिटाला बेंगलुरू बुल्सने पंकज मोहितेची पकड केली पण जर्सी खेचल्यामुळे पुणेरी पलटनला १ गुण मिळाला. त्यामुळे गुण ३२-३२ ने बरोबरीत आले. हा सामना बरोबरीत संपला. त्यामुळे सामन्याचा निकाल टाय ब्रेकरमध्ये लागला.

टाय ब्रेकरमध्ये लागला सामन्याचा निकाल

टाय ब्रेकरमध्ये पुणेरी पलटनकडून पहिल्या चढाईत पंकज मोहितने १ गुण कमवला. बुल्सकडून चढाई करताना अलीरेजाने देखील १ गुण कमवला. पलटनकडून दुसरी चढाई करत असताना आदित्यने एक बोनस गुण घेतला. दोन्ही संघांच्या २-२ चढाईनंतर दोन्ही संघांनी २-२ गुणांची कमाई केली. पलटनकडून तिसऱ्या चढाईत गौरव खत्रीने १ गुण कमवला. बुल्सनेही तिसऱ्या चढाईत १ गुण घेतला. त्यानंतर पलटनच्या चौथ्या चढाईत बुल्सने सचिनची मजबूत पकड केली. पुणेरी पलटननेही आकाश शिंदेची पकड केली. अस्लमने एक गुण घेत गुण बरोबरीत आणले. शेवटच्या चढाईत विशाल भारद्वाजने मजबूत पकड करत पुणेरी पलटनला मिळवून दिला.